Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

।शुक्रवार, दि. २२ मे २०२६ । वर्ष १ ।अंक ४७ ।पाने २।

DIGITAL EDITION


जळगावात हायप्रोफाईल सेक्स रॅकेटचा पर्दाफाश

(पान २ वर)



Selected

## एमआयडीसी दाल मिलला भीषण आग

जळगाव । जळगाव एमआयडीसी परिसरातील कोगटा दाल मिलमध्ये गुरुवारी सकाळी भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून, अग्निशमन दलाच्या जवानांनी तब्बल पाच तास शर्थीचे प्रयत्न करत अखेर आगीवर नियंत्रण मिळवले. माहिती मिळताच अग्निशमन विभागाची पथके घटनास्थळी दाखल झाली.अग्निशमन केंद्र अधिकारी भारत बारी यांच्या मार्गदर्शनाखाली वाहन चालक अक्षय नाईक, नंदू खडके, देविदास सुरवाडे, संतोष तायडे तसेच फायरमन विजय पाटील, पन्नालाल सोनवणे, रोहिदास चौधरी, सौरभ चिकटे, पंकज पाटील, इकबाल तडवी, लखन माळी, योगेश पाटील, विकी सोनवणे, शेख, सुमित साबळे, नितीन राठोड आणि सचिन कोळी यांनी आग विझवण्यासाठी अथक प्रयत्न केले.

## पावसात मोठ्या खंडाची शक्यता, शेतकऱ्यांसाठी बँकांना कडक निर्देश

# ‘महाराष्ट्रावर अल निनोचं मोठं संकट’

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची खरीपपूर्व आढावा बैठकीनंतर माहिती

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई। राज्यात आगामी खरीप हंगामावर ‘अल निनो’चे गंभीर संकट ओढवण्याची शक्यता असल्याची चिंता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे. सह्याद्री अतिथीगृहावर झालेल्या खरीप हंगामपूर्व उच्चस्तरीय बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी हवामान विभागाच्या अंदाजाचा हवाला देत राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता असल्याचे स्पष्ट केले.**

विशेषतः पश्चिम विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील काही भागांमध्ये परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते, असे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, यंदा पावसाचे दीर्घकालीन सरासरी प्रमाण (Long Term Average) सुमारे ८८ टक्के राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. मात्र पावसाचे वितरण अत्यंत असमतोल राहण्याची शक्यता आहे. जूनमध्ये तुलनेने चांगला पाऊस होईल, त्यानंतर जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये पावसाचे प्रमाण टप्प्याटप्प्याने घटण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले. दोन पावसांच्या सरींमध्ये मोठा कालावधी राहू शकतो, त्यामुळे



पिकांवर मोठा परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली. अल निनोच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने जलसंधारणावर विशेष भर देण्याचा निर्णय घेतला आहे. “पडणाऱ्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन करणे आवश्यक आहे. जलयुक्त शिवारसारख्या योजनांची कामे तातडीने आणि वेगाने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत,” असे मुख्यमंत्री म्हणाले. संरक्षित सिंचनासाठी पाणी उपलब्ध राहावे, हा त्यामागील उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. खरीप हंगामाच्या तयारीसाठी झालेल्या बैठकीत राज्यस्तरीय बँकिंग समिती (SLBC) सोबतही चर्चा करण्यात आली.

मुख्यमंत्री म्हणाले की, जिल्हा सहकारी बँका आणि ग्रामीण बँका मिळून ६७ टक्के शेतकऱ्यांना पीककर्ज देतात, तर राष्ट्रीयीकृत बँकांचा वाटा केवळ २६ टक्के आहे. त्यामुळे राष्ट्रीयीकृत बँकांना कर्जवाटपाचा टार्गेट ८० टक्क्यांपेक्षा अधिक पूर्ण करण्याचे कडक निर्देश देण्यात आले आहेत.'

यावेळी त्यांनी स्पष्ट केले की, पीककर्जासाठी कोणत्याही शेतकऱ्याकडून सीबील स्कोअरची मागणी केली जाणार नाही. याबाबत सर्व बँकांच्या शाखांना स्पष्ट सूचना देण्याचे आदेश देण्यात आले असून, आरबीआय अधिकाऱ्यांनीही या भूमिकेला दुजोरा दिला असल्याचे त्यांनी सांगितले. राज्य सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफीसंदर्भातही बैठकीत सविस्तर चर्चा झाल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. “कर्जमाफीची प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी नियोजन करण्यात आले असून ३० जूनपर्यंत ती पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे,” असे त्यांनी स्पष्ट केले.

#### २०१५ प्रमाणे परिस्थिती टाळण्याचे आव्हान

मुख्यमंत्री म्हणाले की, यापूर्वी २०१५ मध्ये अल निनोमुळे गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली होती. त्या वर्षी मराठवाड्यात केवळ ६१ टक्के पाऊस झाला होता. यंदा तशी परिस्थिती निर्माण झाल्यास कोणती उपाययोजना करायची, याबाबत प्रत्येक जिल्हा प्रशासनाला विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यातील कृषी व्यवस्था, जलसंधारण आणि बँकिंग व्यवस्थेला सज्ज राहण्याचे निर्देश देत सरकारने संभाव्य संकटावर मात करण्यासाठी तयारी सुरू केल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## शेळावे खुर्दमध्ये वारंवार वीज खंडित!

### सबस्टेशन असूनही नागरिक अंधारात

**जन सम्राट टाईम्स**



**पारोळा | प्रतिनिधी:** पारोळा तालुक्यातील शेळावे खुर्द गावात गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या वारंवार वीज खंडित प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. गावात स्वतंत्र वीज सबस्टेशन उपलब्ध असतानाही रात्रीच्या वेळी अर्धा ते एक तास वीज पुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. सततच्या वीज समस्येमुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होत असून शेतकरी, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. विशेषतः उष्णतेच्या तीव्र लाटेमध्ये रात्रीच्या वेळी वीज गुल होत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. ग्रामस्थांनी महावितरणच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करत तात्काळ कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात गावातील सामाजिक कार्यकर्ते तथा आदिवासी पारधी क्रांती संघटना जळगाव जिल्हा उपाध्यक्ष आणि भीम आर्मी पारोळा तालुका उपाध्यक्ष प्रविण पारधी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देत प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा निषेध नोंदविला. “गावात स्वतंत्र सबस्टेशन असूनही नागरिकांना अंधारात राहावे लागत असेल, तर ही अत्यंत गंभीर बाब आहे. आम्ही नियमितपणे वीज बिल भरतो, मग आम्हाला मूलभूत सुविधा का मिळत नाहीत?” असा सवाल प्रविण पारधी यांनी उपस्थित केला.

#### वीज गुल होत असल्याने हैराण

उष्णतेच्या तीव्र लाटेमध्ये रात्रीच्या वेळी वीज गुल होत असल्याने नागरिक हैराण झाले आहेयासंदर्भात गावातील सामाजिक कार्यकर्ते तथा आदिवासी पारधी क्रांती संघटना जळगाव जिल्हा उपाध्यक्ष आणि भीम आर्मी पारोळा तालुका उपाध्यक्ष प्रविण पारधी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देत प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा निषेध नोंदविला.

## सुरत–अमरावती एक्स्प्रेस २८ मेपासून एलएचबी कोचसह धावणार; प्रवास अधिक होणार सुरक्षित

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव | प्रतिनिधी:** खान्देशातील रेल्वे प्रवाशांसाठी पश्चिम रेल्वे प्रशासनाने मोठा दिलासादायक निर्णय घेतला असून, गाडी क्रमांक २०९२५/२६ सुरत–अमरावती एक्स्प्रेसचे अत्याधुनिक एलएचबी (LHB) कोचमध्ये रूपांतर करण्यात येणार आहे. येत्या २८ मे २०२६ पासून ही गाडी नव्या अत्याधुनिक रॅकसह ट्रॅकवर धावणार असल्याने जळगाव, भुसावळ, धुळे आणि परिसरातील हजारो प्रवाशांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. रेल्वे प्रशासनाने जाहीर केलेल्या नव्या रचनेनुसार या एक्स्प्रेसमध्ये १ एसी चेयर कार, ४ सेकंड सिटिंग चेयर कार, २ स्लीपर कोच, ७ जनरल कोच, १ एसएलआर आणि १ जनरेटर कोचचा समावेश असणार आहे. एलएचबी कोचमुळे प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि वेगवान प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. खान्देशातील हजारो प्रवाशांना होणार फायदा



सुरत–अमरावती एक्स्प्रेस ही खान्देशातील नागरिकांसाठी महत्त्वाची जीवनवाहिनी मानली जाते. शिंदखेडा, धरणगाव, जळगाव, भुसावळ या भागांतील हजारो नागरिक नियमितपणे सुरत, नंदुरबार, अकोला आणि अमरावतीकडे प्रवास करतात. विशेषतः सुरतच्या औद्योगिक क्षेत्रात काम करणारे कामगार, व्यापारी, शिक्षणासाठी प्रवास करणारे विद्यार्थी तसेच वैद्यकीय उपचारांसाठी ये-जा करणाऱ्या रुग्णांची संख्या मोठी आहे. एलएचबी कोचमुळे अपघाताच्या वेळी डबे एकमेकांवर चढण्याचा धोका कमी होतो, तसेच प्रवास अधिक स्थिर आणि आरामदायी होतो. त्यामुळे कमी खर्चात दर्जेदार रेल्वे प्रवासाची सुविधा मिळणार असल्याने प्रवाशांमध्ये आनंद व्यक्त केला जात आहे. प्रवासी संघटनांकडून निर्णयाचे स्वागत पश्चिम रेल्वेच्या या निर्णयाचे विविध प्रवासी संघटनांकडून स्वागत करण्यात आले आहे. डीआरयूसीसी सदस्य महेंद्र कोठारी तसेच धरणगाव तालुका प्रवासी मंडळाने पश्चिम रेल्वे प्रशासन आणि खासदार स्मिता वाघ यांचे आभार व्यक्त केले आहेत. दरम्यान, भविष्यात खान्देशातील प्रवाशांच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन अधिक गाड्या, अतिरिक्त थांबे, नवीन एक्स्प्रेस सेवा तसेच आधुनिक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी अपेक्षाही प्रवासी संघटनांनी व्यक्त केली आहे.

## शासकीय विश्रामगृह रोकड प्रकरणाची वर्षपूर्ती

### ‘वर्षश्राद्ध’ आंदोलन निष्पक्ष चौकशीच्या मागणीसाठी अनोखे आंदोलन

**जन सम्राट टाईम्स**

**धुळे | प्रतिनिधी :** धुळ्यातील गाजलेल्या शासकीय विश्रामगृह रोकड प्रकरणाला एक वर्ष पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने अनोख्या पद्धतीने आंदोलन करण्यात आले. शासकीय विश्रामगृहाबाहेर भव्य मंडप उभारून, मुंडन, मंत्रोच्चार आणि हिंदू धर्मातील वर्षश्राद्ध विधीप्रमाणे प्रतिकात्मक आंदोलन करत सरकारचा निषेध नोंदविण्यात आला. या आंदोलनादरम्यान माजी आमदार यांनी मुख्यमंत्री यांच्यावर जोरदार टीका करत प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल



चौकशी करण्याची मागणी केली. नेमके काय होते प्रकरण? दि.२१मे २०२५ रोजी विधिमंडळाच्या अंदाज समितीचा धुळे जिल्हा दौरा आयोजित करण्यात आला होता. विविध विकासकामांच्या पाहणीसाठी आलेल्या या समितीत तब्बल २२ आमदार सहभागी होते. या दौऱ्यादरम्यान शासकीय विश्रामगृहातील रूम क्रमांक १०२ मध्ये समितीचे अध्यक्ष आमदार अर्जुन खोतकर यांचे स्वीय सहाय्यक किशोर पाटील यांच्या ताब्यातील तब्बल १ कोटी ८४ लाख ८४ हजार रुपयांची रोकड आढळून आली होती. माजी आमदार अनिल गोटे यांनी ही रक्कम प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर राज्यभरात मोठी खळबळ उडाली होती. वर्षभरानंतरही कारवाई नाही; उबाठा आक्रमक या प्रकरणाला एक वर्ष पूर्ण होऊनही संबंधितांवर कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप करत शिवसेना उबाठा गटाने सरकारविरोधात प्रतिकात्मक आंदोलन छेडले. शासकीय विश्रामगृहासमोर मोठा मंडप उभारण्यात आला होता. आंदोलनादरम्यान हिंदू धार्मिक विधीनुसार वर्षश्राद्ध करण्यात आले. यावेळी उपस्थित कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांसाठी भोजन व्यवस्थाही करण्यात आली होती. आंदोलनस्थळी घोषणाबाजी करत सरकारवर भ्रष्टाचार दडपण्याचा आरोप करण्यात आला. “प्रकरणाची सखोल चौकशी करा” यावेळी माध्यमांशी बोलताना माजी आमदार अनिल गोटे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली.

## फैजपूर हल्ल्याच्या निषेधार्थ तहसीलदारांना निवेदन!



**जन सम्राट टाईम्स**

**मुक्ताईनगर | प्रतिनिधी :** मुक्ताईनगर येथे ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने विविध ज्वलंत प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेत तहसीलदार आणि पोलिस निरीक्षकांना निवेदन देण्यात आले. पेट्रोल-डिझेल टंचाई, आरक्षणातील उपवर्गीकरणाचा निर्णय तसेच फैजपूर येथे फोटोग्राफरवर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ हे आंदोलन करण्यात आले. यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आंदोलनात्मक निवेदनावेळी जिल्हाध्यक्ष लखन पानपाटील, उपजिल्हाध्यक्ष अजय शेलार, भुसावळ तालुका प्रमुख समीर गाडे, ॲड. देवेंद्र बोदडे, ॲड. अशोक बोदडे, प्रमोद बोदडे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. पेट्रोल-डिझेल टंचाईवर संताप निवेदनात जळगाव जिल्ह्यात निर्माण झालेल्या पेट्रोल-डिझेल टंचाईचा मुद्दा प्रखरपणे मांडण्यात आला. अनेक ठिकाणी नागरिकांना इंधनासाठी तासन्तास रांगेत उभे राहावे लागत असून, वाहतूक आणि दैनंदिन कामकाजावर त्याचा गंभीर परिणाम होत असल्याचे संघटनेने नमूद केले. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून इंधन पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी करण्यात आली. उपवर्गीकरण निर्णयाविरोधात तीव्र निषेध संविधान आणि आरक्षण व्यवस्थेविरोधी असल्याचा आरोप करत उपवर्गीकरणाच्या निर्णयाचा ऑल इंडिया पँथर सेनेने तीव्र शब्दांत निषेध केला. हा निर्णय मागास आणि वंचित समाजाच्या हक्कांवर गदा आणणारा असल्याचे सांगत तो तात्काळ रद्द करण्याची मागणी करण्यात आली. फैजपूर हल्ल्याचा निषेध फैजपूर येथे एका फोटोग्राफरवर झालेल्या भ्याड हल्ल्याचा देखील संघटनेने निषेध व्यक्त केला. संबंधित आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. आंदोलनाचा इशारा शासन आणि प्रशासनाने या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास आगामी काळात संपूर्ण जळगाव जिल्ह्यात तीव्र आंदोलन, मोर्चे आणि जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ऑल इंडिया पँथर सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.

#### उपवर्गीकरण निर्णयाविरोधात निषेध

नागरिकांना इंधनासाठी तासन्तास रांगेत उभे राहावे लागत असून, वाहतूक आणि दैनंदिन कामकाजावर त्याचा गंभीर परिणाम होत असल्याचे संघटनेने नमूद केले. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून इंधन पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी करण्यात आली. उपवर्गीकरण निर्णयाविरोधात तीव्र निषेध संविधान आणि आरक्षण व्यवस्थेविरोधी असल्याचा आरोप करत उपवर्गीकरणाच्या निर्णयाचा ऑल इंडिया पँथर सेनेने तीव्र शब्दांत निषेध केला.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## महागाईविरोधात जळगावात ‘चुल्हा जलाओ आंदोलन’

### गॅस, पेट्रोल, स्मार्ट मीटर आणि NEET भ्रष्टाचाराविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव :** वाढती महागाई, पेट्रोल-डिझेल आणि गॅस दरवाढ, स्मार्ट मीटर योजना, बेरोजगारी तसेच NEET परीक्षेतील कथित भ्रष्टाचाराच्या निषेधार्थ बहुजन मुक्ती पार्टीच्या वतीने जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बुधवारी जोरदार “चुल्हा जलाओ आंदोलन” करण्यात आले. शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत झालेल्या या आंदोलनात केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात तीव्र घोषणाबाजी करण्यात आली. राष्ट्रीय परिवर्तन मोर्चाचे राष्ट्रीय संयोजक यांनी जाहीर केलेल्या तीन टप्प्यातील आंदोलनाच्या दुसऱ्या चरणांतर्गत हे आंदोलन देशभरातील जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर करण्यात आले. जळगावात बहुजन



मुक्ती पार्टीचे युवा जिल्हाध्यक्ष सुनिलभाऊ देहडे, राज्य कोषाध्यक्ष विनोदभाऊ अडकमोल आणि राज्य संघटक प्रमोदभाऊ सौंदणे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन पार पडले. आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष चुल्हा पेटवून त्यावर भाकरी व भाजी तयार करत वाढत्या गॅस दरवाढीचा निषेध नोंदवला. “सर्वसामान्य नागरिकांचे जगणे केंद्र सरकारच्या धोरणांमुळे असह्य झाले आहे. पेट्रोल, डिझेल, गॅस आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमती गगनाला भिडल्या असून सामान्य माणूस आर्थिक संकटात सापडला आहे,” असा आरोप आंदोलकांनी केला. यावेळी स्मार्ट मीटर योजनेवरही तीव्र टीका करण्यात आली. “स्मार्ट मीटर ही सामान्य जनतेची लूट करण्याची योजना असून खाजगी कंपन्यांना फायदा मिळवून देण्यासाठी केंद्र सरकार काम करत आहे. या मीटरमुळे वीजबिलांमध्ये वाढ होत असून नागरिकांना मोठा आर्थिक फटका बसत आहे,” असा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. तसेच NEET परीक्षेतील कथित भ्रष्टाचार, बेरोजगारी आणि वाढत्या महागाईमुळे युवकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाल्याचेही यावेळी सांगण्यात आले. “विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या आणि सामान्य जनतेला वेठीस धरणाऱ्या सरकारविरोधात जनआंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल,” असा इशाराही देण्यात आला. आंदोलनानंतर बहुजन मुक्ती पार्टीच्या महिला पदाधिकाऱ्यांनी जळगावचे जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले. यावेळी अनिताताई पेंढारकर, संगिताताई देहडे, शितलताई सोनवणे, दिपालीताई पेंढारकर आणि जयश्रीताई तायडे यांनी चुल्ह्यावर तयार केलेली भाकरी आणि भाजी प्रतीकात्मक स्वरूपात जिल्हाधिकाऱ्यांना भेट दिली. विशेष म्हणजे जळगाव जिल्हा केमिस्ट संघटनेनेही या आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला.

#### आंदोलनात शेकडो कार्यकर्ते सहभागी

केमिस्ट संघटनेचे मा.सुनिलभाऊ भंगाळे व त्यांचे सहकारी,सावरकर रिक्षा युनियनचे दिलीपभाऊ सपकाळे, बहुजन क्रांती मोर्चाचे सुमित्र अहिरे सर, कुंदन तायडे,राष्ट्रीय आदिवासी एकता परिषदेचे खुमानसिंग बारेला,चुडामणदादा सोनवणे,प्रकाशभाऊ मालचे, आंबेडकरी विचारवंत जयसिंग वाघ साहेब,कोळी महासंघाचे गोपाळदादा कोळी,अरुण तावडे साहेब, राष्ट्रीय ओबीसी मोर्चाचे डॉ.एस.एस.राणे सर,वसंत कोलते,किशोर चौधरी, राष्ट्रीय मुस्लिम मोर्चाचे डॉ.शाकीर शेख,हाफिज दानिश, सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे हाफिज कासीम, राष्ट्रीय मुलनिवासी पेन्शनर संघाचे आर.बी.परदेशी,डी.एम.भालेराव, रविंद्र मोरे,रमेश थाटे, त्र्यंबक सोनवणे, भीमराव नन्नवरे,मराठा सेवा संघाचे शेषराव पाटील सर,भारत मुक्ती मोर्चाचे देवाभाऊ निकम,राहुलभाऊ सोनवणे,देविदास पारधे साहेब,मनोहर कोचुरे साहेब,रविदास क्रांती मोर्चाचे अविनाश वानखेडे सर,बुध्दिष्ट इंटरनॅशनल नेटवर्कचे तवन ह्याळिंगे साहेब,मधुकर अहिरे साहेब, प्रभाकर मोरे साहेब, दिलीप तासखेडकर साहेब,असंघटित कामगार संघटनेचे भगवानदादा कांबळे, राष्ट्रीय गोरबंजारा संघाचे धनराज चव्हाण सर, रघुनाथ घोडेस्वार तसेच शे.खलील शे.कुतोबोद्दीन,धनराजभाऊ सरदार,महेंद्र साळवे सर,एन.पी.वले साहेब,आर.के.तायडे साहेब,अशपाकभाई शेख, शे.जावेद शे.मजीद,चिरागोद्दीन शेख,अकिलभाई शेख, आदि शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते.

» Selected

### रावेर तालुक्यात अवैध गौण खनिज वाहतुकीचा सुळसुळाट

**रावेर** । रावेर तालुक्यात अवैध गौण खनिज वाहतुकीने पुन्हा डोके वर काढले असून, दिवसा मातीची तर रात्री मोठ्या प्रमाणावर वाळूची अवैध वाहतूक सुरू असल्याचे गंभीर चित्र समोर येत आहे. तालुक्यातील विविध भागांमध्ये विना परवाना उत्खनन आणि वाहतूक सुरू असल्याने महसूल प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. वाढत्या अवैध वाहतुकीमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून तातडीने कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे. रावेर शहरासह खिरवड, अटवाडे, के-हाळा, धामोडी, ऐनपूर आणि कांडवेल परिसरात मोठ्या प्रमाणावर अवैध गौण खनिज वाहतूक सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. काही भागांत दिवसाढवळ्या मातीचे उत्खनन करून ट्रॅक्टर आणि डंपरच्या माध्यमातून वाहतूक केली जात असल्याचे सांगितले जात आहे. तर रात्रीच्या वेळी अवैध वाळू वाहतूक करणारी वाहने मोठ्या प्रमाणावर रस्त्यांवरून धावत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# परिचारिकांना प्रशासकीय बदलीतून वगळण्याची मागणी!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन; परिचारिकांना दिलासा द्या अशी मागणी

जन सम्राट टाईम्स



**धुळे | प्रतिनिधी:** महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभागात कार्यरत परिचारिकांना प्रशासकीय बदली प्रक्रियेतून कायमस्वरूपी वगळण्यात यावे, अशी जोरदार मागणी महाराष्ट्र गव्हर्मेंट नर्सेस संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे. या संदर्भात संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री कार्यालयाकडे सविस्तर निवेदन सादर करत परिचारिकांच्या समस्या आणि अडचणी शासनासमोर मांडल्या. निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील परिचारिका या आरोग्य व्यवस्थेचा कणा असून ग्रामीण, दुर्गम आणि शहरी भागात दिवस-रात्र अखंडपणे रुग्णसेवा बजावत आहेत. विशेषतः कोविड महामारीच्या कठीण काळात स्वतःच्या जीवाची पर्वा न करता परिचारिकांनी जीव धोक्यात घालून सेवा दिली. त्यामुळे आरोग्य व्यवस्थेतील त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आणि संवेदनशील स्वरूपाचे असल्याचे संघटनेने नमूद केले. संघटनेच्या मते, परिचारिकांना प्रशासकीय बदलीच्या कक्षेत आणल्यामुळे अनेक गंभीर सामाजिक, मानसिक आणि कौटुंबिक समस्या निर्माण होत आहेत. परिचारिकांकडे कोणत्याही प्रकारचे आर्थिक किंवा प्रशासकीय नियंत्रण नसताना त्यांना बदली प्रक्रियेत समाविष्ट करणे अन्यायकारक असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. "परिचारिका हा स्त्रीप्रधान व्यवसाय आहे. अचानक होणाऱ्या बदल्यांमुळे महिलांचे कौटुंबिक आयुष्य विस्कळीत होते. मुलांचे शिक्षण, महिलांची सुरक्षितता, वृद्ध आई-वडिलांची जबाबदारी आणि कौटुंबिक स्थैर्यावर त्याचा गंभीर परिणाम होतो," असे संघटनेने निवेदनात स्पष्ट केले आहे. तसेच रुग्णालयांतर्गत नियमित बदल्या होत असल्याने स्वतंत्र प्रशासकीय बदलीची आवश्यकता राहत नसल्याचेही संघटनेने म्हटले आहे. सततच्या बदल्यांमुळे मानसिक ताण वाढत असून त्याचा थेट परिणाम रुग्णसेवेच्या गुणवत्तेवर होण्याची शक्यता असल्याची भीती संघटनेने व्यक्त केली आहे. अनेक परिचारिका आणि त्यांचे पती वेगवेगळ्या ठिकाणी नोकरी करत असल्याने कौटुंबिक समस्या अधिक गंभीर बनत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे परिचारिकांना प्रशासकीय बदली प्रक्रियेतून कायमस्वरूपी वगळून शासनाने सहानुभूतीपूर्वक निर्णय घ्यावा, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली. हे निवेदन देताना महाराष्ट्र गव्हर्मेंट नर्सेस संघटनेच्या अध्यक्षा श्रीमती प्रतिभा घोडके यांच्यासह मनीषा कुलकर्णी, अनुपमा लोंढे, सचिन कुंभार, कविता सरदार, भावना सोनवणे, जयश्री पाटील, प्रीती कोळी, कमल जाधव, वर्षा माने, मृणालिनी हिरे, समिता नादकर, स्वाती न्हावी, धनश्री सोनवणे आदी पदाधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कौटुंबिक स्थैर्यावर गंभीर परिणाम

अचानक होणाऱ्या बदल्यांमुळे महिलांचे कौटुंबिक आयुष्य विस्कळीत होते. मुलांचे शिक्षण, महिलांची सुरक्षितता, वृद्ध आई-वडिलांची जबाबदारी आणि कौटुंबिक स्थैर्यावर त्याचा गंभीर परिणाम होतो," असे संघटनेने निवेदनात स्पष्ट केले आहे.

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

# देशीदारू कारखान्यावरकारवाई साडेआठ लाखांचा माल जप्त

## आरोपी पोलिसांना चकवा देत फरार



जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी:** धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यात बनावट देशीदारू निर्मिती करणाऱ्या अड्ड्यावर राज्य उत्पादन शुल्क विभागाने धाडसी कारवाई करत संपूर्ण कारखानाच उद्ध्वस्त केला. या कारवाईत बनावट मद्यनिर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य, स्पिरीट, हजारो बाटल्या तसेच एक चारचाकी वाहन असा तब्बल ८ लाख ४७ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मात्र, पथक घटनास्थळी पोहोचताच मुख्य आरोपीसह त्याचा साथीदार अंधाराचा फायदा घेत पसार झाला. महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय उपआयुक्त यू. आर. वर्मा आणि धुळे अधीक्षक स्वाती काकडे यांनी बनावट मद्यनिर्मिती व विक्री रोखण्यासाठी कडक दक्षता घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार शिरपूर येथील निरीक्षक देविदास नेहूल यांना गुप्त माहिती मिळाली होती की, न्यू बोराडी ग्रामपंचायतीअंतर्गत जामन्यापाडा शिवारातील मच्छिंद्र तारासिंग पावरा यांच्या झोपडीवजा घरात बनावट देशीदारू तयार केली जात आहे.

या माहितीच्या आधारे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने दोन पंचांच्या उपस्थितीत छापा टाकला. कारवाईदरम्यान घटनास्थळी बनावट देशीदारू निर्मितीचा मोठा साठा आढळून आला. पथकाने ९० मिलीच्या ३०० सीलबंद बाटल्या, ४५० लिटर तयार बनावट देशीदारू, १२ हजार रिकाम्या बाटल्या, ५०० लिटर शुद्ध मद्यार्क (स्पिरीट), ५ हजार जिवंत बुचे, ३०० रिकामे खोके, २० प्लास्टिक ट्रे, दोन प्लास्टिक कॅन, दोन कॅप सीलिंग मशीन आणि एक बोलेरो पिकअप वाहन जप्त केले. पथक पोहोचल्याचे लक्षात येताच आरोपी राजेश पावरा आणि त्याचा एक साथीदार घटनास्थळावरून फरार झाले. या प्रकरणी महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ब), (क), (ड), (ई), (फ), ८१, ८३, ९० आणि १०८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार आरोपींचा शोध सुरू आहे. तसेच या अवैध व्यवसायासाठी साहित्य पुरवणाऱ्या इतर साथीदारांचाही शोध घेतला जात आहे. ही कारवाई निरीक्षक देविदास नेहूल यांच्या नेतृत्वाखाली जवान काशिनाथ गोसावी, प्रतीकेश भामरे, वाहन चालक रविंद्र देसले यांच्या पथकाने केली. यासाठी हाडाखेड सीमा तपासणी नाका येथील दुय्यम निरीक्षक मुकेश पाटील, संतोष निकम, जवान एम. पी. म्हस्के, हेमंत पाटील आणि वाहन चालक निलेश मोरे यांनीही सहकार्य केले. दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास अधीक्षक स्वाती काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक देविदास नेहूल करीत आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, अवैध मद्यनिर्मिती, वाहतूक किंवा विक्रीबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास विभागाच्या टोल फ्री क्रमांक 18002339999, व्हॉट्सॲप क्रमांक 8422001133 किंवा दूरध्वनी क्रमांक 02562-297484 वर संपर्क साधावा.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# जळगावात हायप्रोफाईल सेक्स रॅकेटचा पर्दाफाश

## तीन महिलांसह एक पुरुष ताब्यात



जन सम्राट टाईम्स

**जळगाव :** जळगाव शहरात पुन्हा एकदा रहिवासी भागात सुरू असलेल्या हायप्रोफाईल वेश्या व्यवसायाचा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. निमखेडी रोड परिसरातील 'ब्रह्मांड नायक' अपार्टमेंटमध्ये छुप्या पद्धतीने सुरू असलेल्या सेक्स रॅकेटवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने (AHTU) धडक कारवाई करत तीन महिलांसह एका पुरुषाला ताब्यात घेतले. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.गोपनीय माहितीवरून पोलिसांचा सापळा निमखेडी रोडवरील ब्रह्मांड नायक अपार्टमेंटमधील एका फ्लॅटमध्ये देहव्यापार सुरू असल्याची खात्रीशीर माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी अत्यंत गुप्तपणे कारवाईची योजना आखत सापळा रचला.ठरलेल्या नियोजनानुसार, पोलिसांनी प्रथम एका बनावट ग्राहकाला संबंधित फ्लॅटमध्ये पाठवले. त्या व्यक्तीने आत जाऊन पैशांची बोलणी करत वेश्या व्यवसाय सुरू असल्याची खात्री केली. व्यवहार निश्चित झाल्यानंतर बाहेर थांबलेल्या पोलीस पथकाला मोबाईलवर 'मिस कॉल' देऊन इशारा करण्यात आला. मिस कॉल मिळताच पोलिसांची धाड पंटरकडून इशारा मिळताच अपार्टमेंटबाहेर दबा धरून बसलेल्या एएचटीयूच्या पथकाने तात्काळ फ्लॅटमध्ये धाड टाकली. या कारवाईत पोलिसांनी तीन महिलांसह एका पुरुषाला ताब्यात घेतले. घटनास्थळावरून काही साहित्य आणि पुरावेही जप्त करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. मार्गदर्शनाखाली कारवाई ही कारवाई जळगाव जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. प्रोबेशनरी डीवायएसपी प्रशांत देरेकर, पोलीस उपनिरीक्षक दिनेश बडगुजर, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील, नीलिमा हिवराळे, अनिल पाटील, पोलीस हवालदार विजय पाटील, भूषण कोल्हे तसेच महिला पोलीस हवालदार वहिदा तडवी यांच्या पथकाने ही धडक कारवाई यशस्वी केली.

### रॅकेटचे धागेदोरे शोधण्याचे आव्हान

सध्या याप्रकरणी जळगाव तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, या रॅकेटमागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, तसेच या अवैध व्यवसायाचे धागेदोरे इतर ठिकाणी पसरले आहेत का, याचा सखोल तपास पोलीस करत आहेत. पोलिसांच्या या कारवाईमुळे जळगाव शहरातील अवैध व्यवसायांवर मोठा आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे उपाध्यक्ष मुकेश सारवान यांची केडीएमसीला भेट

जन सम्राट टाईम्स



**कल्याण। प्रतिनिधी ::** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील सफाई कामगारांच्या विविध समस्या, मागण्या तसेच त्यांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा आढावा घेण्यासाठी महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे उपाध्यक्ष यांनी आज कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला भेट दिली. यावेळी त्यांनी महापालिका प्रशासनासोबत सविस्तर चर्चा करत सफाई कर्मचाऱ्यांच्या अडचणी, कामाच्या सुविधा आणि कल्याणकारी योजनांबाबत माहिती घेतली. या बैठकीस महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे, महापालिका सचिव किशोर शेळके, उपायुक्त वंदना गुळवे, घनकचरा विभागाचे उपआयुक्त रामदास कोकरे, कार्यकारी अभियंता प्रसाद सखदेव, संदीप तांबे, सुरेंद्र टेंगळे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपा शुक्ल, सहाय्यक आयुक्त सुषमा मांडगे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि सफाई कामगार संघटनांचे अध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान सामान्य प्रशासन विभागाच्या उपायुक्त वंदना गुळवे यांनी महानगरपालिकेमार्फत सफाई कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, उपक्रम आणि कल्याणकारी धोरणांचे सादरीकरण केले. सफाई कर्मचाऱ्यांच्या मानसिक आणि आरोग्यासाठी महापालिकेकडून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती देताना त्यांनी प्रशासनाच्या प्रयत्नांची सविस्तर माहिती मांडली. यावेळी बोलताना उपाध्यक्ष मुकेश सारवान यांनी सफाई कामगारांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि सामाजिक स्थैर्यासाठी महानगरपालिकेकडून करण्यात येणाऱ्या कामांचे कौतुक केले. हे शहराच्या आरोग्य व्यवस्थेचा कणा आहेत. त्यांच्या कल्याणासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करणे आवश्यक आहे," असे त्यांनी नमूद केले. महापालिकेत सलग २५ वर्ष सेवा बजावलेल्या सफाई कर्मचाऱ्यांची स्वतंत्र यादी तयार करून त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य योजनेअंतर्गत घरांचा लाभ मिळवून देण्याचे निर्देशही त्यांनी प्रशासनाला दिले.

# मोबाईल घेतल्याच्या रागातून विद्यार्थ्याची आत्महत्या!

जन सम्राट टाईम्स

**कल्याण | प्रतिनिधी :** मोबाईल गेमच्या वाढत्या व्यसनाचे गंभीर परिणाम पुन्हा एकदा समोर आले असून, वडिलांनी मोबाईल काही वेळासाठी काढून घेतल्याच्या रागातून नववीत शिकणाऱ्या १४ वर्षीय विद्यार्थ्याने टोकाचे पाऊल उचलत आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना मोहिली गावात घडली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून पालकांमध्येही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कु. कार्तिक दिनेश वायले (वय १४) हा मोहने येथील एनआरसी शाळेत नववी इयत्तेत शिक्षण घेत होता. सध्या शाळांना उन्हाळ्याच्या सुट्ट्या सुरू असल्याने कार्तिक घरीच जास्त वेळ मोबाईलवर गेम खेळत होता. मुलाच्या वाढत्या मोबाईल वापरामुळे चिंतित झालेल्या वडिलांनी त्याचा मोबाईल काही वेळासाठी काढून घेतला होता. मात्र, याच गोष्टीचा राग मनात धरून कार्तिकने घरात ठेवलेले तणनाशक प्राशन केले. घटनेची माहिती मिळताच कुटुंबीयांनी तातडीने त्याला जवळील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र तणनाशकाचे विष शरीरात मोठ्या प्रमाणात पसरल्याने उपचारादरम्यान त्याची प्राणज्योत मालवली. एका क्षणिक रागातून घेतलेल्या निर्णयामुळे एका कुटुंबाचा आधार हिरावल्याने परिसरात शोककळा पसरली आहे. या घटनेमुळे मोबाईल गेमच्या वाढत्या व्यसनाबाबत पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. लहान वयातील मुलांमध्ये मोबाईल आणि ऑनलाईन गेम्सचे वाढते आकर्षण त्यांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम करत असल्याची चिंता नागरिक व्यक्त करत आहेत. विशेषतः पालक आणि मुलांमधील संवाद कमी होत चालल्याने अशा घटना घडत असल्याचे मत मानसोपचार तज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे.

# 'त्या' रासायनिक कंपनीविरोधात ग्रामस्थ आक्रमक; (NA) प्लॉटवर नियमबाह्य उद्योग सुरू असल्याचा आरोप

## परवाना रद्द करून कारखाना स्थलांतरित करण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स



**नशिराबाद |** येथील रहिवासी परिसरात सुरू असलेल्या एका खासगी फळ प्रक्रिया कंपनीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचा गंभीर आरोप करत ग्रामस्थांनी प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला आहे. उग्र रासायनिक वास, सांडपाण्याची समस्या आणि वाढत्या प्रदूषणामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी संबंधित कंपनीचा परवाना तातडीने रद्द करावा, तसेच हा उद्योग औद्योगिक क्षेत्रात स्थलांतरित करावा, अशी जोरदार मागणी केली आहे. यासंदर्भात ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने अप्पर जिल्हाधिकारी श्रीमंत हाकार यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनानुसार, मौजे नशिराबाद येथील गट क्रमांक १०३६ मधील प्लॉट क्रमांक ३७ आणि ३८ वर 'फार्मफ्रेस प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीकडून फळांवर रासायनिक प्रक्रिया करून ज्युस निर्मितीचे काम सुरू आहे. या प्रक्रियेदरम्यान परिसरात तीव्र आणि गोडसर रासायनिक वास पसरत असून, त्यामुळे स्थानिक नागरिकांना श्वसनाचे त्रास, फुफ्फुसांचे विकार आणि अन्य आरोग्यविषयक समस्या निर्माण होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, कंपनीमधून दररोज मोठ्या प्रमाणावर रासायनिक सांडपाणी बाहेर सोडले जाते. हे सांडपाणी परिसरात साचून राहत असल्याने दुर्गंधी वाढली असून डासांचा प्रादुर्भावही मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. परिणामी, परिसरातील लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना डेंग्यू, मलेरिया, त्वचारोग तसेच खाज सुटण्यासारख्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणातील आणखी गंभीर बाब म्हणजे, ज्या जागेवर हा कारखाना सुरू आहे त्या जागेला प्रशासनाकडून रहिवासी प्रयोजनासाठी अकृषक (NA) परवाना देण्यात आलेला आहे. नियमानुसार या जागेचा वापर केवळ निवासी कारणांसाठी होणे अपेक्षित असताना, त्या ठिकाणी औद्योगिक आणि व्यावसायिक स्वरूपाचा उद्योग सुरू करून नियमांचे सर्रास उल्लंघन करण्यात येत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. रहिवासी भागात अशा प्रकारचा रासायनिक प्रक्रिया उद्योग सुरू ठेवणे धोकादायक असल्याचेही नागरिकांनी निवेदनात नमूद केले.

### यांनी दिले निवेदन

निवेदन देण्यासाठी पंकज शामकांत महाजन, रविंद्र संतोष चौधरी, राहुल सुरेश चौधरी, निवृत्ती वासुदेव कोळी, वैभव संजय गोसावी, मुरलीधर गोविंदा पवार, भूषण कांतीलाल साळुंखे, संदीप आनंदा धनगर, भूषण भानुदास कोल्हे, संदीप विष्णू पाटील यांच्यासह नशिराबाद येथील अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# गवारला कवडीमोल भाव; संतप्त शेतकऱ्याने दीड क्विंटल गवार रस्त्यावर फेकली

## साक्री तालुक्यातील काशीपूर येथील घटना; "एक रुपया किलो भावात शेती कशी परवडणार?

जन सम्राट टाईम्स



**साक्री, धुळे : | प्रतिनिधी :** बाजारात गवार पिकाला अत्यंत कमी भाव मिळत असल्याने धुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा संताप आता उफाळून येऊ लागला आहे. साक्री तालुक्यातील काशीपूर येथील एका शेतकऱ्याने तर संतापाच्या भरात तब्बल दीड क्विंटल गवार थेट रस्त्यावर फेकून शासन आणि बाजार व्यवस्थेविरोधात तीव्र रोष व्यक्त केला. पेरेजपुर फाटा परिसरात घडलेल्या या प्रकारामुळे काही काळ रस्ता अक्षरशः हिरवागार दिसत होता. या घटनेने परिसरात मोठी चर्चा रंगली असून शेतकऱ्यांच्या व्यथा पुन्हा एकदा समोर आल्या आहेत. काशीपूर येथील शेतकरी साहेबराव कारंडे यांनी मोठ्या आशेने आपल्या शेतात गवार पिकाची लागवड केली होती. पिकासाठी बियाणे, खते, औषधे, सिंचन आणि मजुरी यावर हजारो रुपयांचा खर्च करण्यात आला. गेल्या अनेक महिन्यांपासून मेहनत घेत पीक जोपासल्यानंतर बाजारात योग्य दर मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्षात बाजार समितीत गवारला अवघा शंभर रुपये क्विंटल, म्हणजेच केवळ एक रुपया किलो असा दर मिळत असल्याचे पाहून शेतकरी हादरून गेला. दररोज दहा ते बारा मजुरांच्या मदतीने शेतातून गवार काढणी करण्यात येत होती. काढणी, वाहतूक आणि बाजारात नेण्याचा खर्चच निघत नसल्याने साहेबराव कारंडे यांचा संताप अनावर झाला. अखेर त्यांनी पेरेजपुर फाटा येथे गवारचे पोते रस्त्यावर रिकामे करत निषेध नोंदवला. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात गवार पसरल्याने काही काळ वाहतुकीवरही परिणाम झाला. "शेती करायची तरी कशी? उत्पादन खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. मजुरी, खते, औषधे, डिझेल यांचे दर गगनाला भिडले आहेत. मात्र बाजारात मालाला भावच मिळत नाही. एक रुपया किलो दराने विक्री करून आम्ही जगायचं कसं?" असा सवाल संतप्त शेतकऱ्यांनी उपस्थित केला. यावेळी परिसरातील इतर शेतकरीही एकत्र आले होते. त्यांनी शासनाच्या कृषी धोरणावर नाराजी व्यक्त करत शेतमालाला हमीभाव देण्याची मागणी केली. "शेतकरी रात्रंदिवस कष्ट करून पीक घेतो, पण शेवटी त्याच्या हातात काहीच राहत नाही. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी जगायचं कसं?" असा संतप्त प्रश्न उपस्थित करण्यात आला. कृषी क्षेत्रातील असंतोष अधिक तीव्र होण्याची चिन्हे गेल्या काही दिवसांपासून अनेक भाजीपाला पिकांचे दर कोसळल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. बाजारात व्यापाऱ्यांकडून अत्यल्प दर दिले जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष वाढत आहे.

### कृषी क्षेत्रातील असंतोष तीव्र होण्याची चिन्हे

यापूर्वीही टोमॅटो, कांदा, भेंडी आणि इतर पिके रस्त्यावर फेकून आंदोलन करण्यात आले होते. आता गवार उत्पादक शेतकऱ्यांनीही आक्रमक भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, शासनाने तातडीने हस्तक्षेप करून शेतमालाला योग्य बाजारभाव मिळवून द्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे. या घटनेमुळे पुन्हा एकदा शेतकरी आणि बाजार व्यवस्थेतील दरी अधोरेखित झाली असून, कृषी क्षेत्रातील असंतोष अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

# शहरातील नव्या मालमत्तांची घरपट्टी वसुली रखडली!

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** शहरात मोठ्या प्रमाणावर नवीन घरे व इमारती उभ्या राहत असतानाही अनेक मालमत्तांची अद्याप घरपट्टी आकारणी झालेली नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर उपमहापौर मनोज चौधरी यांनी महानगरपालिका प्रशासनाच्या कामकाजावर तीव्र नाराजी व्यक्त करत संबंधित विभागांची खरडपट्टी काढली.

या बैठकीला उपायुक्त धनश्री शिंदे, हाऊस टॅक्स विभागाचे अधिकारी, प्रभाग अधिकारी, टाउन प्लॅनिंग विभागाचे अधिकारी तसेच नवीन घर मॅपिंगसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. बैठकीत शहरातील नव्याने बांधण्यात आलेल्या मालमत्तांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी अनेक घरे प्रत्यक्ष वापरात असूनही त्यांची अधिकृत नोंदणी आणि घरपट्टी आकारणी अद्याप प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले.

यावर उपमहापौर मनोज चौधरी यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारत, महानगरपालिकेच्या महसुलाला फटका बसत असताना संबंधित विभागांची निष्क्रियता गंभीर असल्याचे सांगितले. शहरातील प्रत्येक नव्या मालमत्तेचे तात्काळ सर्वेक्षण करून त्यांची घरपट्टी नोंदणी पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.